**दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई**

(दि विदर्भ **को– ऑप.बँक** लि., सम्मिलीत )

(शेडयुल्ड बँक)

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन,

फोर्ट, मुंबई ४०० ००१, पोस्ट बॉक्स नं.४७२

फोन नं. ९१-०२२–२२८००७४७/२२८७६०१५ ते २०, Web Site: www.mscbank.com

---

## चल व अचल मालमत्ता विक्रीसाठी देण्याबाबतची निविदा सुचना

दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप.बँक लिमिटेड मुंबई **"सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल असेटस ॲन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट २००२"** नुसार कर्जदार संस्थांच्या खालील नमुद मालमत्तेची विक्री करण्यासाठी मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

कर्जदार व मालमत्तेचा तपशिल खालील प्रमाणे :– (रु.लाखात)

| अ क्र | संस्थेचे नांव | क्षमता | मालमत्ता तपशील | राखीव किंमत (रु. लाखात) | बयाना रक्कम (रु. लाखात) १० % | मालमत्ता पाहण्याची तारीख | निविदा उघडण्याची तारीख | येणेबाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | स.म.स्व.बापूरावजी देशमुख ससाका.लि., वेळा ता–हिंगणघाट, जि.वर्धा | २५०० मे.ट. प्रती.दिन | लॉट – अ<br>जमीन १८२.९५ एकर व इमारत | २४५१.३६ | २४५.१३ | ०२.११.२० व ०३.११.२० सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | २६.११.२० दुपारी ४.०० वाजता | राज्य बँक १२७८३.६८ (३०.०६.२०२०) सहभागातील बँका ३३०५.३२ (३१.१२.२०१८) |
| | | | लॉट -ब<br>प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी, स्क्रॅप व स्टोअरमाल | १२२४.५० | १२२.४५ | | | |
| | | | एकूण | ३६७५.८६ | ३६७.५८ | | | |
| | वरीलपैकी लॉट नं.अ व ब एकत्रित घेण्यास प्रथम प्राधान्य | | | | | | | |
| २ | तालुका शेतकरी दालमिल प्रक्रिया सह.संस्था मर्या, उदगीर,जि.लातूर | १ टन प्रति तास | इमारत, प्लॅन्ट व मशिनरी आणि जमीन (६९४० चौ.मी.) | १०४.२९ | १०.०० | ०२.११.२०व ०३.११.२० सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | २६.११.२० सयांकाळी ५.०० वाजता | ४४८.१४ (३१.०३.२०२०) |

**अ) विक्रीसाठी अटी खालील प्रमाणे –**

१. उपरोक्त मालमत्ता 'जशी आहे आणि जिथे आहे, ज्या स्थितीत व जे आहे' अशा अटीवर व ज्यास कोणतीही हमी, खात्री, बंधन, जबाबदारी वा प्रतिनिधीत्व शिवाय असलेल्या तत्वावर विकण्यात येईल. चल – अचल मालमत्तेचे क्षेत्रफळ, संख्या इ. बाबत कोणतीही हमी, खात्री, जबाबदारी इ.बाबत प्राधिकृत अधिकारी जबाबदार असणार नाहीत. प्रा.फंड, शासकीय देणी, विज बिल, पाणी बिल, कामगार देणी, इ.वा अन्य वैधानिक देणी (सद्याची व भविष्यात निर्माण होणारी) सर्वदेणी भागविण्याची जबाबदारी अ.क्र.१ साठी (प्रोरेटा बेसिसवर) खरेदीदाराची राहील.

२. निविदा राखीव किंमतीपेक्षा जादा असणे तसेच विनाअट असणे आवश्यक आहे. निविदेत नमूद रक्कम अंतिम समजली जाईल. परंतू निगोशिएशन होणार नाहीत. निविदा भरताना ही बाब लक्षात घेणे जरुरी आहे. टेंडर उघडण्याच्या दिवशी प्राधिकृत अधिकारी सर्वोच्च निविदा भरणा-या निविदाधारकास यशस्वी घोषित करतील. यशस्वी निविदाधारकास मालमत्ता स्वतःच्या नांवावर करुन घेण्यासाठी लागणारा खर्च उदा. मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इ. करावा लागेल.

३. निविदा सोबत १० % बयाणा रक्कमेचा भरणा बँकेत निविदा जमा करणेपूर्वी आर. टी. जी. एस. द्वारे (RTGS/NEFT:IFSC:MSCI 0082002 A/c No.116459 MSCB Agro Dept) दि महाराष्ट्र स्टेट को. ऑप. बँक लि., मुंबई येथे जमा करणे आवश्यक आहे. अयशस्वी निविदाधारकांना बयाणा रक्कम त्या दिवशी किंवा पुढील दिवशी परत करणेत येईल. बयाणा रक्कमेवर व्याज देण्यात येणार नाही.

४. निविदा पुस्तिका (बीड डाक्युमेंट) साखर कारखान्यासाठी बँकेचे मुख्य कचेरी, मुंबई येथील डीआयआरआर विभागाचे व्यवस्थापक व प्राधिकृत अधिकारी, नागपूर यांचेकडे तर संस्था क्र.२ तालुका शेतकरी दालमिलसाठी बँकेचे मुख्य कचेरी येथील डीआयआरआर विभागाचे व्यवस्थापक तसेच प्रादेशिक कार्यालय, नांदेड येथील प्राधिकृत अधिकारी यांचेकडे दि.२६.१०.2020 ते दि.२५.११.२०२० या दरम्यान कार्यालयीन दिवशी (दुसरा व चौथा शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत मिळतील.

तसेच निविदा पुस्तिका (बीड डॉक्युमेंट) बँकेच्या बेबसाईटवरुनही ([www.mscbank.com](http://www.mscbank.com) ) डाऊनलोड करुन भरता येतील. मात्र निविदा बँकेत जमा करणेपूर्वी बँकेत त्यांनी बीड डॉक्युमेंटपोटी अ.क्र.१साठी रु.२९,५००/- व अ.क्र.२ साठी रु.१७,७००/- चा एन.ई.एफ.टी.द्वारे भरणा आवश्यक राहिल.

५. निविदाधारक अ.क्र.१ साठी लॉट 'अ' किंवा लॉट 'ब' किंवा लॉट 'अ' व 'ब' एकत्रित लॉटसाठी वेगवेगळया निविदा भरु शकतात. प्रत्येक लॉटसाठी स्वतंत्र बयाणा रक्कम भरणा करावयाची आहे. बयाणा रक्कमेचा भरणा निविदेत नमूद खात्यावर आर.टी.जी.एस. व्दारे करावयाचा आहे. लॉट 'अ' व 'ब' दोन्हीसाठी एकत्रित निविदा भरणाऱ्या निविदाधारकांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

६. निविदा दाखल करावयाची अंतिम तारीख दि.२५.११.२०२० सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. निविदा मुख्य कचेरी, मुंबई येथे दाखल कराव्यात.

७. विक्री संबंधित प्राप्त निविदा उघडण्याची तारीख २६.११.२०२० रोजी अ.क.१ करीता ४.०० वाजता व अ.क्र.२ करीता ५.०० वाजता मुख्य कचेरी, दुसरा मजला, सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई ४०० ००१, येथे उघडण्यात येतील.

८. योग्य ते कारण देवून कोणतीही निविदा स्विकारण्याचा/ रद्दबादल ठरविण्याचे अधिकार बँकेच्या प्राधिकृत अधिकारी यांना राहिल.

९. प्रत्येक संस्थेच्या विक्री मालमत्तेच्या निविदा पुस्तिका (बीड डॉक्युमेंट) बँकेच्या www.mscbank.com वेबसाईटवरही दि.२६.१०.२०२० ते दि.२५.११.२०२० पर्यंत उपलब्ध राहील. (यातील अटी/शर्ती विक्रीस लागू राहतील.)

१०. उपरोक्त माहितीतील मुद्दे, अटी, शर्तीच्या स्पष्टतेसाठी बँकेच्या www.mscbank.com वेबसाईटवर आणि दैनिक लोकसत्ता व दैनिक फायनान्सियल एक्स्प्रेसमध्ये बँकेने दि.२६.१०.२०२० रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीतील माहितीचा आधार घ्यावा व तो अंतिम राहील.

**वैधानिक नोटीस**

कर्जदार आणि जामिनदार यांना सुचित करण्यात येते की, बँकेच्या एकूण कर्ज येणेबाकीचा भरणा निविदा उघडणेपूर्वी करावा. अन्यथा जप्त मालमत्तेची विक्री करुन कर्ज वसुली केली जाईल. तसेच विक्री प्राप्त रकमेतून संपूर्ण वसुली न झाल्यास उर्वरित कर्जबाकी व्याज व इतर खर्चासह आपणांकडून वसुली केली जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
( डॉ. अजित देशमुख )
व्यवस्थापकीय संचालक तथा प्राधिकृत अधिकारी
दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बँक लि., मुंबई

दिनांक :- २६.१०.२०२०
ठिकाण :- मुंबई